# उच्च शिक्षणातील गुणवत्ता विकासासाठी संशोधनाची आव्हाने

**प्रा. डॉ. महादेव सदाशिव डिसले,** *सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी*

Received: 11/02/17 | Edited: 16/02/17 | Accepted: 25/02/17 | Area: Education

**प्रस्तावना**

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. हे आपणास ज्ञात आहेच त्याबरोबरच आज आपणास चार बाबींच्या स्फोटाविषयी खूप ऐकण्यास मिळते त्यात माहितीचा प्रस्फोट, ज्ञानाचा प्रस्फोट, लोकसंख्‍येचा प्रस्फोट आणि अपेक्षांचा प्रस्फोट या बाबी आता सर्वमान्य आहेत. या सर्व प्रस्फोटांचा बारकाईने विचार केला तर आपल्या असे लक्षात येईल की, अलिकडे दिवसेंदिवस ज्ञानाच्या कक्षा रुंदावत आहेत. नवनविन ज्ञानशाखा उदयास येत आहेत. ज्ञानाचे नवनवीन पैलू समाजापुढे येत आहेत या सर्व स्थानिक ते जागतिक स्तरावरील बौध्दीक संपेदच्या बदलत्या स्वरुपाचा मूलाधार म्हणजे आज विविध शाखा-उपशाखा, विषयांमध्ये संशोधनाचे वाढलेले प्रमाण हा दिसून येतो.

आज जागतिक उच्च शिक्षण प्रणाली प्रमाणेच भारतीय उच्च शिक्षणामध्ये संशोधन क्षेत्र हे अतिशय महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. उच्च शिक्षणात होणाऱ्या असंख्य संशोधनातून मिळालेले निष्कर्ष हे उच्च शिक्षणाची सद्य:स्थिती पर्यायाने सामाजिक, शैक्षणिक परिस्थिती सकारात्मक दृष्टिकोणातून बदलण्यासाठी अत्यंत महत्वाचे ठरतात. म्हणजे संशोधनाचे योगदान हे औद्योगिक, शैक्षणिक, वैद्यकिय शास्त्रे व सामाजिक शास्त्रे या व अशा पुष्कळशा क्षेत्रांसाठी, शाखा-उपशाखांसाठी अत्यंत महत्वपूर्ण ठरते.

आजपर्यंत असंख्य संशोधकांनी वेगवेगळया क्षेत्रांमध्ये संशोधने केलेली आहेत त्या संशोधकांच्या संशोधन कार्याचे योगदान समाजाच्या व शिक्षणाच्या गुणात्मक विकासासाठी विचारात घेतले गेले आहे. तसेच नवीन होऊ घातलेल्या संशोधनासाठी ते दिशादर्शक ठरत आहे.

भारतीय उच्च शिक्षण प्रणाली तसेच महाराष्ट्र राज्यातील उच्च शिक्षण व्यवस्था, विद्यापीठ अनुदान आयोगासारखी स्वतंत्र व स्वायत्त संस्था आणि राज्यसरकारे तसेच विद्यापीठ प्रशासन या सर्वांच्या संदर्भाने आज उच्च शिक्षणात होत असलेल्या संशोधनांची संख्यात्मक वाढ, संशोधनाचा गुणात्मक दर्जा, क्षेत्रनिहाय संशोधकांची संशोधन कार्यातील निखळ तळमळ, संशोधनाची गरज व त्याची सामाजिक उपयोगिता त्या संशोधन कार्यामुळे ज्ञानात मूलभूत स्वरुपात पडलेली भर किंवा विशिष्ट संशोधन क्षेत्रात झालेल्या कार्याचे विशिष्ट दृष्टिकोनातून असलेले विश्लेषण इ. विविध अंगांनी या चिंतन लेखात विचार मांडण्यात आलेले आहेत. प्रामुख्याने उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यामध्ये संशोधन क्षेत्रासमोरच काही आव्हाने उभी असलेली जाणवतात. त्या अनुषंगाने आपण चर्चा करणार आहोत.

| उच्च शिक्षणातील संशोधनासमोरील आव्हाने | | | |
|---|---|---|---|
| **अ) विद्यापीठ स्तरावरील प्रशासकीय स्वरुपाची आव्हाने** | | **ब) संशोधकांसमोरील संशोधन कार्य प्रणालीतील आव्हाने** | |
| १ | संशोधकांसाठीची पेट परीक्षा | १ | संशोधन क्षेत्र व शीर्षकाची योग्य निवड |
| २ | संशोधनासाठी द्यावयाचे विषय/शीर्षक | २ | सुयोग्य संशोधन पध्दतीची निवड |
| ३ | संशोधनाची गुणवत्ता व त्याचा स्तर | ३ | संशोधकांचा संघ/ सांघिक संशोधनातील उदासीनता |
| ४ | संशोधक व संशोधन मार्गदर्शक निखळ संशोधन कार्याची तळमळ | ४ | संशोधनात शैक्षणिक संस्थांच्या सहभागा विषयी आव्हाने |
| ५ | संशोधन मान्यता समिती अधिकार व दायित्व | ५ | अंत:प्रेरणेचा अभाव |
| ६ | संशोधन क्षेत्रातील मौखिकता व गुणवत्तेचा स्तर उंचावणे | ६ | पूरक माहिती संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन |
| ७ | संशोधन केंद्रे: विकेंद्रिकरणाचा एक घटक | ७ | संशोधनाचे आधार |
| | | ८ | संशोधनाचा आधार सामाजिक उपयोगिता व यशस्वीता |

उच्च शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा वाढविण्यामध्ये संशोधन क्षेत्रांसमोर विविध स्वरुपाची आव्हाने उभी असलेली आपणास पाहायला मिळतात. त्यातीलच कांही आव्हाने वर उल्लेखलेली आहेत. त्यांचा थोडक्यात आढावा आपण पुढील प्रमाणे घेऊया !

**अ. विद्यापीठ स्तरावरील प्रशासकीय स्वरुपाची आव्हाने**

विद्यापीठ अनुदान आयोगाचे निर्देश, राज्य सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या बाबी तसेच राज्यातील विद्यापीठांच्या प्रशासकीय घटक-उपघटकांकडून समोर आलेल्या उच्च शिक्षणामधील संशोधनविषयक आव्हानांमधील काही आव्हाने आपण विचारात घेणार आहोत.

**१. संशोधकांसाठी पेट (PET) परीक्षा**

विद्यापीठांतर्गत पीएच.डी. स्तरावर संशोधन करु इच्छिणारे पुष्कळ संशोधक पीएच.डी. साठीची पात्रता परीक्षा देतात ती पेट उत्तीर्ण होतात. या परीक्षेचे स्वरुप विद्यापीठनिहाय, शाखानिहाय वेगवेगळे असल्याचे समजते. या परीक्षेतून आशय व संशोधन दृष्टिकोन, क्षमता यांची चाचपणी कितपत वस्तुनिष्ठपणे होते हा प्रश्नच उरतो. विद्यापीठांतर्गत शाखा व विषयनिहाय उपलब्ध असलेल्या संशोधनाच्या जागा व उत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण लक्षात घेता संशोधनाच्या संख्यात्मक वाढीचा हा राजमार्ग ठरतो. कारण 'पेट' परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना संशोधक म्हणून निखळ संशोधन करण्याची तळमळ असतेच असे नाही तेंव्हा गुणवत्ता व दर्जा यांचा विचार करता 'पेट' परीक्षा हेच आव्हान ठरते.

**२. संशोधनार्थ द्यावयाचे विषय/शीर्षक**

'पेट' उत्तीर्ण असणारा उमेदवार हा संशोधन विषय निवड, शीर्षक मांडणीच्या धावपळीत गुंतलेला असतो. विशिष्ट क्षेत्रातील जाणकारांचे तो सल्ले घेऊन अप्रत्यक्षपणे स्वतःची आवड, क्षमता व दृष्टिकोन या सर्वांकडे दुर्लक्षच करतो. कांही वेळा तर 'तुम्ही सूचवाल / द्याल त्या विषयांवर मी संशोधन कार्य करतो/करते' ही संशोधकांची भूमिका पहावयास मिळते. परंतू त्याआधी आपण घेणार असलेला विषय, त्याचे क्षेत्र, शीर्षकांची मांडणी इ. अंगांनी पुनरावृत्ती तर होत नाही का? याचा विचार न करता संशोधन माग्रदर्शक व संशोधक यांचे आवडीचे, कार्याचे अभ्यासक्षेत्र, त्यातील ज्ञान, अनुभव इ. चा सखोल व विस्तृतपणे विचार न करता संशोधनार्थ विषय/शीर्षक मान्य करणे हेच उच्च शिक्षणातील संशोधनासमोरील आव्हान वाटते.

**३. संशोधनाची गुणवत्ता व त्याचा स्तर**

उच्च शिक्षणात विद्यापीठ स्तरावर होणाऱ्या संशोधनांची गुणवत्ता व त्याचा स्तर हा अत्युच्च पातळीचा असायला हवा. संशोधनातून व्यक्ती व कार्याची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता अधिक वृध्दिंगत कशी होईल याचाही अधिक गांभीर्याने विचार व्हायला हवा. त्यादृष्टीने विधायक सूचना, मार्गदर्शक तत्वे व उपाययोजना मांडून त्याची तातडीने कार्यवाही विद्यापीठ स्तरावरुन केली जावी हीच सर्वांच्या दृष्टीने हितकारक बाब आहे. परंतू बरोबर याऊलट कमी अधिक फरकाने सर्वच विद्यापीठामधील सद्यःस्थितीतील परिस्थिती असल्याचे दिसून येते. त्यामुळे मौलिक संशोधन करणारे संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, मार्गदर्शक यांना योग्य न्याय देणे हेच आव्हान ठरते आहे. परिणामी उच्च शिक्षणातील संशोधन क्षेत्रातील मौलिकता, गुणवत्तेचा स्तर कमी होत चाललेला दिसून येतो.

**४. संशोधक विद्यार्थी, संशोधन मार्गदर्शक यांची निखळ संशोधन कार्याची तळमळ**

पीएच.डी., एम.फिल. स्तरावर संशोधन कार्य पूर्ण करण्यापाठीमागील हेतू लक्षात घेता आकर्षित करणाऱ्या वेतनावर मिळणारी नोकरी किंवा नोकरीत असल्यास मिळणाऱ्या अतिरिक्त वेतनवाढी करीता संशोधन करुन, नाव नोंदवून संशोधनाची संख्यात्मक वाढ मोठया प्रमाणावर होत असल्याचे दिसते. आज जे संशोधक विद्यार्थी या स्तरावर संशोधन कार्य करु इच्छितात त्यांपैकी किती जणांना विषयाच्या विशिष्ट अध्ययन क्षेत्रांमध्ये संशोधनासाठी रस आहे. त्यात त्यांचे कितपत चिंतन, लेखन वा संशोधन केले आहे याची शाहनिशा न करताच संशोधन मार्गदर्शक व विद्यार्थी संशोधन क्षेत्र निवडतात. सुरुवातीलाच संशोधकाची विशिष्ट अभ्यासक्षेत्रा विषयीची क्षमता न पारखताच त्याला प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न होताना दिसतो. म्हणून दर्जेदार व गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी सर्वांचीच निखळ संशोधन करण्याविषयीची तळमळ असणे आवश्यक वाटते. मार्गदर्शक आणि विद्यार्थ्यांचे ज्या संशोधन क्षेत्रात स्पेशलायझेशन असेल त्याच क्षेत्रात विद्यापीठाने त्यांना संशोधनासाठी मान्यता द्यावी.

**५. संशोधन मान्यता समिती (RRC) अधिकार व दायित्व**

राज्यातील सर्वच विद्यापीठांतर्गत पीएच.डी. व एम.फिल पदवीसाठी संशोधन करणाऱ्या सर्वच संशोधकांना संशोधन मान्यता समिती (RRC) ची मान्यता असल्याशिवाय संशोधन कार्य करता येत नाही. या समिती मध्ये त्या-त्या विद्याशाखेचे अधिष्ठाता असतात. अनुभवी व तज्ज्ञ सदस्य असतात त्यांनी आपापल्या शाखेनुरुप कोणकोणत्या क्षेत्रात संशोधन आणखी झालेले नाही, त्याच प्रमाणे कोणकोणत्या क्षेत्रात संशोधन होण्याची गरज आहे. विशिष्ट क्षेत्र वा विषयाची अनावश्यक पुनरावृत्ती तर होत नाही ना, ज्ञानात मुलभूत स्वरुपाची भर किंवा विशिष्ट संशोधन क्षेत्रात झालेल्या कार्याचे विशिष्ट दृष्टीकोणातून विश्लेषण इ. हे संशोधनाचे मूलभूत निकष संशोधनार्थ दिलेल्या विषयात पाहीले गेले आहेत की नाहीत या विषयी आर.आर.सी व तिचे एक सदस्य असलेल्या अधिष्ठात्यांनी काळजी घेतल्यास संशोधनाची गुणवत्ता व दर्जा घसरणार नाही उलट उत्तरोत्तर त्यात वाढच होत राहील. परंतू या विषयीची सद्यःस्थिती हा विशेष चिंतनाचा व संशोधनाचा विषय असल्याचे दिसून येते.

**६. संशोधन क्षेत्रातील मौलिकता व गुणवत्तेचा स्तर उंचावणे**

संशोधन क्षेत्रातील मौलिकता व गुणवत्तेचा स्तर कमी होत असेल तर त्या त्या स्खलनाला प्रतिबंध करुन संशोधनाची अपेक्षित गुणवत्ता साध्य करण्यासाठी वाटचाल करता येईल असे माझे मत आहे.

याचा अर्थ अगोदर सारेच चांगले होते आणि आताच ही सगळी अवनती होत आहे असे मी कधीच माणनार नाही कारण प्रत्येक पिढीमध्ये नवी ऊर्जा, नवी प्रेरणा नि प्रज्ञा असते यावर माझा विश्वास आहे. फक्त होऊ घातलेल्या नव संशोधकांना योग्य मार्गदर्शन नि संधी मिळाली तर होणारे संशोधन अत्यंत मौल्यवान व गुणवत्तापूर्ण होईल यात दुमत नाही. परंतू आज संशोधनांची पुनरावृत्ती त्यातून ज्ञानात मुलभूत स्वरुपात पडणारी भर, त्याची सामाजिक उपयोगिता या व अशा स्वरुपाच्या मुद्यांवरील प्रश्न एकंदरीतच संशोधनाच्या गुणवत्ता व दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

**७. संशोधन केंद्र:संशोधन प्रक्रियेतील विकेंद्रिकरणाचा घटक**

२००९ च्या यु.जी.सी. निर्देशित पीएच.डी. अधिनियमानुसार राज्यातील विद्यापीठांनी शाखा व विषय निहाय विद्यापीठातील विभाग व संलग्नित महाविद्यालयांना संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी मान्यता दिली. यामागचा प्रामाणिक उद्देश हा असावा की, ज्यामुळे विद्यापीठ प्रशासनाचा संशोधन प्रक्रिया राबविण्याचा ताण कमी करणे व गुणात्मक, दर्जेदार संशोधनासाठी सर्व घटकांना प्रोत्साहन देणे त्या त्या विद्यापीठाने संशोधन केंद्रांना अधिकारासोबत कांही कर्तव्ये पार पाडण्याच्या हेतूने या प्रक्रियेतील विकेंद्रिकरणाचा अत्यावश्यक घटक बनविले खरे परंतु प्रत्यक्ष क्षेत्रवर सद्य:स्थितीत चित्र वेगळेच दिसते. संलग्नित महाविद्यालयातील संशोधन केंद्रांपैकी किती केंद्रे पीएच.डी. चा अभ्यासक्रम, कोर्सवर्कसाठीचे सत्र आयोजन, वेळोवेळी माहिती देणे, संशोधन कार्यशाळा, सेमिनार इत्यादी आयोजन करणे तसेच संशोधन लेख सादरीकरण करणे यासारखे संशोधन पूरक कार्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करतात. विद्यापीठ व संशोधन केंद्रे यांच्यात खूप कमी बाबतीत समन्वय असल्याचे दिसते. या सर्व अधिकार आणि कर्तव्य यांच्या सारीपाटाच्या डावात बळीचा बकरा बनतो खरा तो संशोधक. ज्या संशोधन केंद्रात प्रवेश घेतला त्या केंद्रावर संशोधकास अभ्यासक्रम पूर्ततेपर्यंत फक्त अधिकारांवर असलेले लक्ष हे विकेंद्रिकरणातले आव्हानाच मानावे लागेल.

अशा प्रकारे उपरोक्त मुद्यांचा विचार करता उच्च शिक्षणातील संशोधनासमोरील आव्हानांची एक बाजू आपणासमोर अंशत: ठेवली या आव्हांनांबरोबरच विद्यापीठ स्तरावरील प्रशासनासमोर इतरही स्वरुपाची आव्हाने आहेत. त्या बरोबरच उच्च शिक्षणामध्ये संशोधकांसमोरील संशोधन कार्यप्रणालीतील काही आव्हाने आपण प्रातिनिधीक स्वरुपात पाहूया.

**ब. संशोधकांसमोरील संशोधन कार्य प्रणालीतील आव्हाने**

**१. संशोधन क्षेत्र वा शीर्षकाची योग्य निवड**

संशोधकाने आपल्या संशोधनाचे शीर्षक निवडताना, निश्चित करताना त्यासंबंधी स्त्रोतांची उपलब्धता किती आहे याचा विचार करावा. तसेच वेळ व लागणारा पैसा यांचाही विचार करावा. त्याच बरोबर संशोधन कार्य करताना ज्यांच्यापर्यंत पोहचावयाचे आहे ते लोक, संस्था इ. चा योग्य विचार संशोधकाने संशोधन क्षेत्र व शीर्षक यांची निवड करताना करावयास हवा. तसे नाही केल्यास आपण आपल्या निवडीला योग्य न्याय देऊ शकत नाही. आपण निवडलेले क्षेत्र व शीर्षक या संबंधी आगोदर झालेल्या संशोधनातील अतिरिक्त व अनावश्यक सैध्दांतिक भाग माहितीची पुनरावृत्ती टाळणे हेच संशोधकांसाठी हिताचे ठरते असे न केल्यास आपण निवडलेले संशोधन क्षेत्र व शीर्षक हेच संशोधन कार्यपूर्तीतील आव्हान ठरते.

**२. सुयोग्य संशोधन पध्दतीची निवड**

उच्च शिक्षणातील विविध शाखांत संशोधन कार्य करु इच्छिणाऱ्या संशोधकांनी शीर्षक निश्चितीनंतर कोणतही संशोधन पध्दती निश्चित न करता मिश्र पध्दतीने समस्येच्या पूर्णांशाने विचार केला तर तुम्हाला तुमचे विशिष्ठ उत्तर मिळेल आणि तुमचे उत्तर हेच तुमचे प्रथम मार्गदर्शक ठरेल, त्यातून तुम्हाला संशोधन कार्य कसे पार पाडावे याचा अभ्यासाचा आराखडा निश्चित करता येईल. परंतू एकदा का हा आराखडा निश्चित झाला की मग तुमची संशोधनाची पध्दती ही अत्यंत स्पष्ट असली पाहिजे. कारण तुम्ही तुमच्या या बाबतीतल्या क्षमता ओळखा, क्षमतांशी प्रमाणिक रहा व तुमच्या क्षमतांचा पुरेपेर वापर करा. उपलब्ध वेळेनुसार एक कृती कार्यक्रम ठरवून घ्या आणि उत्तमरीतीने तुमचे संशोधनकार्य पूर्ण करा. परंतू शीर्षक निश्चितीनंतर सुयोग्य रीतीने संशोधन पध्दतीची निवड न झाल्यास संशोधन पूर्ण करणे हे प्रत्येक पायरीवर जीकीरीचे व आव्हानात्मक वाटते.

**३. सांघिक संशोधनातील उदासीनता**

एकदा संशोधन कार्य पूर्ततेसाठी कृतीकार्यक्रम ठरला की, आपल्या संशोधन क्षेत्राशी, शीर्षकाशी जवळपास समन्वयीत असलेल्या इतर संशोधकबंधूशी संपर्क करुन 'संशोधकांचा एक संघ' गठीत करता येईल. आपल्या संशोधन कार्यापुरते ते आपले सहकारी असणार आहेत. आपल्या प्रत्येक कामावर त्यांच्याकडून प्रत्याभरण अवश्य मिळवा. संशोधकांचा हा संघ मात्र आपापसातील कार्याची कसून चौकशी करणारा चाणाक्ष अशा सदस्यांनी मिळून बनल्यास कार्य गतीने होईल. कमीत कमी वेळात योग्य दिशेने होईल. संशोधन कार्यासंबंधी संशोधक म्हणून तुमच्या गरजा अगदी स्पष्ट असाव्यात त्यापूर्ण होण्यात तुम्ही स्वत:ला झोकून द्या त्यामुळे सांघिक शक्तीमधून संशोधन कार्य हे कमी वेळात उद्दिष्ठाधिष्ठीत पूर्ण होईल. या कामात जर आपला उदासीन दृष्टिकोन पुढे आला तर संशोधन शीर्षक, उद्दिष्टे यानुरुप संशोधन कार्य वेळेत पूर्ण करणे आव्हानात्मक ठरेल.

**४. संशोधनात शैक्षणिक संस्थांच्या सहभागाविषयी आव्हाने**

संशोधन कार्य पूर्ण करताना माहिती संकलनासाठी तुम्ही एखाद्या शैक्षणिक संस्थेकडे गेलात परंतू त्या संस्थेने, कार्यालयाने तुम्हाला आवश्यक ती माहिती पुरविण्यास नकार दर्शविला तर तेथेच न थांबता त्यांचा पाठपुरावा योग्य मार्गाने सकारात्मक करा. पर्यायी मार्ग वापरा.

प्रयत्नांती यश आल्यास माहिती देणारा प्रतिसादक, संस्था, कार्यालय यांचे संशोधनासाठी जतन करा. त्यांच्याशी चांगले नातेसंबंध विकसित करा, तसेच तुम्ही स्वत: पूर्वग्रहविरहित मनाने स्वत:ला स्वीकारा, स्वता:ला झोकून देऊन संशोधनातून नाविण्यपूर्ण बाबी शिकण्याची तयारी ठेवा. सर्वात महत्वाचे म्हणजे स्वत:च्या प्रतिमेचे महत्व ओळखा व इतरांनही ते पटवून द्या. बऱ्याच वेळा सामाजिक शास्त्रातील संशोधक माहिती संकलनाबाबत समस्यांनी व्यग्र असतात. त्रासतात त्याचा परिणाम त्यांच्या संशोधन कार्यावर होतो.

### ५. पूरक माहिती संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

संशोधन कार्यात संशोधकाने संशोधनाशी असलेली स्वत:ची नाळ तोडू नये. संशोधनासाठी संकलित करण्यात आलेल्या माहिती बरोबरच तुमच्या मूळ संशोधन पध्दतीकडे लक्ष द्या. तुम्हाला प्रतिसादकांकडून प्राप्त झालेली माहिती ही पूर्णांशाने लक्षात घेऊनच पुढील कार्य करा. माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन या कामी आधुनिक तंत्रज्ञानचा वापर जरुर करावा. पूर्ण संशोधन कार्य हे वस्तुनिष्ठपणे व पूर्वग्रहविरहित असावे. माहिती संकलनासाठीच्या साधनांचे विकसन, प्रमाणिकरण इ. वस्तुनिष्ठपणे व्हावे. प्राप्त माहितीतून तपशीलवार सर्व मांडणी करावी. अर्थनिर्वचन योग्य परिभाषेत झाल्यास निष्कर्षाप्रत पोहचणे सहजसाध्य होते. परंतू माहिती संकलनाचे साधन, संख्याशास्त्रीय तंत्र, वापरलेली परिभाषा यापैकी काही सदोष असल्यास या टप्प्यावर संशोधकास विविध आव्हानांचा सामना करणे अपरिहार्य ठरते. तेंव्हा एक उत्तम संशोधकासाठीचे आवश्यक ते सर्व गुण अंगीकारुन जर हे कार्य पूर्ण केले तर छोटया मोठया आव्हानांवर संशोधक सहज मात करु शकेल.

### ६. संशोधनाचे सादरीकरण

उच्च शिक्षणामध्ये विविध शाखानिहाय व विषय निहाय संशोधनाचे सादीकरण करण्याच्या पध्दतीमध्ये विविधता असल्याचे लक्षात येते. तसेच विद्यापीठांच्या नियमावली प्रमाणेही त्यात वैविध्यता असते. म्हणून संशोधकाने आपली शाखा-उपशाखा व विषय यानुरुप आपल्या संशोधन कार्याचे सादीकरण करावे. सादरीकरण करताना संशोधन अहवाल लेखन, मांडणी, बांधणी या बाह्य बाबीं सोबतच अंतरंगातील प्रकरणयोजना, प्रकरण, विभाग निहाय तपशीलवार आशयाची मांडणी, नकाशे, आकृत्या, आलेख, सारणी इ. चे योग्य तांत्रिकता लक्षात घेऊन सादरीकरण करावे. संशोधन अहवालातील अत्यंत सूक्ष्मातील सूक्ष्म बाबही योग्य संशोधनात्मक परिभाषेतून व योग्य तांत्रिकता लक्षात घेऊनच सादर करणे आवश्यक वाटते. विशेषत: प्रकरणांची मांडणी, परिशिष्टांची मांडणी व संदर्भग्रंथ सूची इत्यादी बाबत अत्यंत बारकाईने व कटाक्षाने सादरीकरण होणे आवश्यक असते. सद्य:स्थितीमध्ये सामाजिक शास्त्रे विशेषत: शिक्षणशास्त्रातील संशोधनाच्या बाबतीत विद्यापीठनिहाय संशोधन सादीकरणात विविधता असलेली दिसून येते. यातील आपले क्षेत्र, शाखा, स्तर, विषय, विद्यापीठ इ. बाबी लक्षात घेऊन संशोधन अहवालाचे सादरीकरण एक वाक्यता येईल काय? हे एक आव्हान असल्याचे दिसून येते.

### ७. संशोधनाचे आधार

उच्च शिक्षणात होणाऱ्या विविध संशोधनात संशोधकास स्वत:ला व्यावसायिक व नोकरीविषयक फायदा होईल. असा त्याचा आधार असावा यात शंका नाही. परंतु त्या बरोबरच आपल्या संशोधनाचा समाजास उच्च प्रतिचा फायदाच झाला पाहिजे हा ही आग्रह असायला हवा. कारण यासाठी उच्च प्रतिची दर्जेदार ग्रंथालये, माहिती केंद्रे, लेखन केंद्रे ही त्या संशोधन कार्याचा मूलाधार असतात. त्या संशोधनातून विद्यार्थ्यांच्या यशस्वीते बरोबरच अभ्यासक्रमाची यशस्वीता प्रकाशझोतात येत असते. शैक्षणिक संशोधन केंद्रे, विविध संस्था, संघटना, समाजातील घटक हेही संशोधनाचे आधार असतात. परंतु अलिकडे 'घोकणे आणि ओकणे' 'जितके मिळाले तितके लिहावे, अधिकचा अट्टाहास न रहावा' या प्रमाणे संशोधकांची मानसिकता दिसत असल्यामुळे संशोधनाचे बदलते आधार हे एक आव्हान ठरत आहे.

### ८. संशोधनाची सामाजिक उपयोगिता व यशस्वीता

संशोधकाने आपले संशोधन कार्य अत्यंत कुशलपणे व अभ्यासपूर्ण, सर्वांग संपूर्ण दृष्टिने पूर्ण केले तर त्याची सामाजिक उपयोगीता वाढलेली दिसते. तसेच एक यशस्वी संशोधक नावारुपाला येते. त्याचे ते संशोधन कार्य सामाजिक परिवर्तनासाठी दिशादर्शक ठरते.

संशोधन कार्य पूर्ण झाल्यानंतर त्याचे निष्कर्ष ज्या ज्या घटकांशी संबंधीत आहेत. ज्यांना लागू आहेत त्या सर्वांपर्यंत ते पोहचविणे किंवा संशोधन सारांशाने पोहचविण्याचा प्रयत्न करणे, काही शैक्षणिक संस्थांना ते मार्गदर्शन ठरत असतील तर त्यांना ते स्वीकारण्यासाठी त्यांचे मन वळविणे इ. जरी आव्हानात्मक असले तरी अशक्य नाही. त्यामुळे आपोआपच संशोधनाची सामाजिक उपयोगिता वाढणार आहे. आपल्या संशोधन क्षेत्रातील कार्याचे विशिष्ट दृष्टिकोनातून विश्लेषण केले आणि त्याची यशस्वीता समाजातील घटकांना पटवून दिल्यास संशोधन सर्वदूर पोचहण्यास मदत होते त्यासाठी मुद्रीत व इलेक्ट्रॉनिक माध्यमे प्रशासन त्यातील अधिकारी, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था, तज्ज्ञ व अनुभवी मंडळी यांचा उपयोग करता येईल.

अशा प्रकारे आपणास वरील मुद्यांचा आधारे प्रत्यक्ष संशोधकांसमोरील संशोधन कार्य प्रणालीतील आव्हाने स्पष्ट करता येतील. या आव्हानांशिवाय आणखीही काही आव्हाने शाखा, उपशाखा, विषय, विद्यापीठ, स्तर इ. नुसार संशोधकांपुढे असतात त्यांचा सामना करत करत संशोधक आपले संशोधन कार्य गुणवत्तापूर्ण व दर्जेदार करण्याचा प्रयत्न शेवटपर्यंत करत असतात.

**सारांश**

उच्च शिक्षणातील संशोधना समोरील आव्हानांमध्ये आपण विद्यापीठ स्तरावरील प्रशासकीय स्वरुपाची आव्हाने आणि संशोधकां समोरील संशोधन कार्यप्रणालीतील आव्हाने या अंतर्गत काही प्रातिनिधीक स्वरुपांच्या आव्हानांचा परामर्श घेतला आहे. त्यावरील उपाययोजनात्मक बाजूने विचार मांडताना असे स्पष्ट करता येते की, विद्यापीठ स्तरावरील संशोधनविषयक समित्यांमध्ये मा.कुलगुरु या सर्व समित्यांचे पदसिध्द अध्यक्ष असले तरीही खऱ्या अर्थाने जबाबदारी समिती सदस्यांची व तज्ज्ञांची असते. तेंव्हा या सर्वांनी आपापले अधिकार व दायित्व लक्षात घेऊन विद्यापीठांतर्गत संशोधनाची गुणवत्ता व दर्जा वृध्दिंगत करण्यासाठी अधिक गांभीर्याने विचार करावा.

आर.आर.सी. ने ही मार्गदर्शकांना मान्यता देताना विशिष्ट संशोधन क्षेत्र त्यातील त्यांची आवड, लेखन, वाचन, चिंतन व संशोधन क्षेत्र त्यातील त्यांची आवड, लेखन, वाचन, चिंतन व संशोधन इ. लक्षात घ्यावे तसेच त्यांचे स्पेशलायझेशन लक्षात घेऊनच मान्यता द्यावी म्हणजे मार्गदर्शक आणि संशोधक विद्यार्थी ज्या क्षेत्रात स्पेशलायझेशनचे असतील त्याच क्षेत्रात संशोधनासाठी त्यांना मान्यता देता येणे शक्य होते. पर्यायाने मौलिक व गुणवत्तापूर्ण संशोधनकार्य होण्यास प्रोत्साहन मिळेल. संशोधनाची संख्यात्मक वाढ आपोआपच थांबली जाईल यामुळे संशोधन क्षेत्रातील बजबजपुरीला नक्कीच पायाबंद बसेल आणि महत्वाचे म्हणजे कोणीही, कशावरही संशोधन नि मार्गदर्शन करावे हे चित्रच नाहीसे झालेले दिसेल.

उच्च शिक्षणातील संशोधनासमोरील आव्हानांतवर मात करुन आपण गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, मौलिक व समाजोपयोगी संशोधन कार्य करण्यास हातभार लावणे हे आद्यकर्तव्य ठरते. कारण संशोधनक्षेत्र हेच भविष्यकालिन बदलाचा समाजिक राजमार्ग आहे. यातूनच भविष्याभिमुख उदयोत्सुक, परिवर्तनशील व प्रगतीशील समाज निर्माण होईल हे नक्की !!

**संदर्भग्रंथः**

१. www.walden.duc.in.Research Challenges (And How to over come them) by Deirdre Schwiesow (Jan.२०१०)
२. यु.म.पठाण, (२०१५), 'मार्गदर्शन आणयाचे तरी कुठूण?', दैनिक दिव्यमराठी दिनांक -_____,(पृष्ठ क्र.७ वरील लेख)